नवी आशा नवी दिशा

# सार्वमत


अहमदनगर | मंगळवार, १६ जुलै २०२४ | पान १२

## विठ्ठल नामाने दुमदुमली ठाणगाव नगरी

**ठाणगाव-** येथील रामजी पुंजाजी भोर विद्यालय व डॉ. अण्णासाहेब शिंदे कनिष्ठ महाविद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त विठूनामाचा जयघोष करत गावातून दिंडी काढण्यात आली. यामुळे संपूर्ण गाव परिसर विठूनामाच्या जयघोषाने दुमदुमून निघाला. विद्यार्थ्यांनी वारकरी, साधू-संतांच्या वेशभूषा साकारल्या होत्या. टाळ-मृदुंगाच्या गजरात गावातून दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेतून नृत्य सादर करत सर्वांना थक्क केले. दिंडीचे पूजन प्राचार्य बाळासाहेब पगारे, पर्यवेक्षक भाऊसाहेब तोरकड, रामनाथ शिंदे, उपसरपंच विलास मोरे, सुदाम शिंदे, रामदास भोर, सचिन शिंदे, मोहन आव्हाड, दत्तू शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

## सोनई परिसरात दोन तास धो-धो पाऊस

**सोनई (वार्ताहर)-** सोनई व परिसरात सोमवारी दुपारी अचानकपणे आलेल्या जोरदार पावसाने नागरिकांची धावपळ उडाली. दुपारनंतर वातावरणात बदल होऊन ढगाळ वातावरण झाले. दोन तास झालेल्या धो-धो पावसानंतर रिमझिम चालूच होती. सोनई, शिंगणापूर, हनुमानवाडी, गणेशवाडी, लांडेवाडी, बेल्हेकरवाडी तसेच खेडले शिरेगाव परिसरात सोमवारचा पाऊस झाल्याने कपाशी, सोयाबीनसह चारा पिकाला जीवदान मिळाले आहे. मागील महिन्यात लागवड व पेरण्या केल्या परंतु पाऊस न पडल्याने कपाशी सोयाबीन व तुरीचे पीक सुकून चालले होते. या पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले असल्याने शेतकऱ्यांचे चेहरे खुलले आहेत.




## महत्त्वाचे

### पोहेगाव परिसरात विद्युत केबल चोरीचे प्रमाण वाढले

**सोनेवाडी (वार्ताहर)-** कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव परिसरात भुरट्या चोरांनी नवीन फंडा सुरू केला असून शेतातील विहिरींवर केबली चोरीचा सपाटा लावला आहे. या चोरांचा शिर्डी पोलिसांनी बंदोबस्त करावा, अशी मागणी दीपक रोहमारे यांनी केली आहे. पोहेगाव परिसरात पाटील मळा, गणपती मंदिर परिसरात शेतकऱ्यांच्या विहिरीवरील चोरट्यांनी दोन दिवसांपासून चोरी करण्यास सुरुवात केली असून चोरलेल्या केबल मधील ॲल्युमिनियम व तांब्याची तार काढून ती बाजारात विकून पैसे कमवायची नामी शक्कल वापरण्यात चोरटे तरबेज ठरत आहेत. पाऊस झाल्यामुळे शेतकरी आपल्या शेतात जात नसल्याचे लक्षात आल्याने हा सर्व उद्योग हे चोरटे करीत आहेत. मात्र आपल्या विहिरीवरील विद्युत मोटारी चालू करण्यासाठी नवीन केबल घेण्यासाठी शेतकऱ्यांना हजारो रुपयांच्या वर खर्च येत आहे. काही दिवसांपूर्वी या चोरट्याने शेतकऱ्यांच्या विहिरीवरील विद्युत मोटारीसह स्टार्टरच्याही चोऱ्या केलेल्या आहेत. या चोरट्यांचा पोलीस स्टेशनने बंदोबस्त करावा, अशी मागणी दीपक रोहमारे यांनी केली.

### राहुरी शहरासह तालुक्यात आषाढ सरी बरसल्या

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)-** राहुरी शहरासह तालुक्यात काल दमदार आषाढ सरी कोसळल्या. या पावसामुळे खरिपाला जीवदान मिळाल्याने बळीराजा सुखावला आहे. काल दुपारनंतर राहुरी शहरासह तालुक्यातील बहुतांश भागात दमदार पावसाने हजेरी लावली. तालुक्यातील टाकळीमिया, उंबरे, बाम्हणी, वांबोरी, विद्यापीठ, बारागाव नांदूर परिसरात जोरदार पाऊस झाला. मागिल महिन्यात तालुक्यात काही ठिकाणी पेरणीयोग्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी कपाशी, सोयाबीन, तूर, मका, आदी पिकांच्या पेरणी व लागवडी केल्या होत्या. मात्र, पावसाने दडी मारल्याने ही पीके पाण्याअभावी सुकू लागली होती. त्यामुळे खरीप वाया जाण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला होता. परंतु, काल झालेल्या दमदार पावसामुळे या पिकांना नवसंजीवनी मिळाली असून दुबार पेरणीचे संकट टळले आहे. काल सकाळपासून पावसाचे वातावरण निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागून होत्या. दुपारनंतर अधून-मधून हलक्या सरी कोसळत होत्या. दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास पावसाचा जोर वाढला. सुमारे दोन तास चाललेल्या पावसाने शहरातील सखल भागात व ग्रामिण भागात शेतीतील पीकांत पाणी साचले होते. त्यानंतर सायंकाळी पुन्हा पावसाने हजेरी लावली होती.

# महात्मा फुले कृषी विद्यापीठ कर्मचाऱ्यांचा उपोषणाविरोधात मूकमोर्चा

## सर्व कर्मचारी विद्यापीठ प्रशासनासोबत असल्याची ग्वाही



**राहुरी (तालुका प्रतिनिधी)-** महात्मा फुले कृषी विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. मिलिंद अहिरे यांनी दि. १० जुलैपासून सुरू केलेल्या उपोषणाविरोधात विद्यापीठातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी काल दुपारी जेवणाच्या सुट्टीत मोठ्या संख्येने मूकमोर्चा काढून कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील आणि उपकुलसचिव व्ही.टी. पाटील यांना उपोषणाविरोधात निवेदन दिले.

निवेदनात म्हटले की, डॉ. डी. के. कांबळे यांनी विद्यापीठ प्रशासनाशी बोलणे झाल्यानंतर उपोषण मागे घेतलेले आहे. डॉ. मिलिंद अहिरे हे उपोषण मागे घेण्यास तयार नाही. विद्यापीठाच्या इतिहासात कोणत्याही कुलगुरुंकडून मागासवर्गीय किंवा कोणत्याही एका समुदायावर कधीही अन्याय झालेला नाही. डॉ. अहिरे हे त्यांच्या वैयक्तिक प्रश्नाला सामाजिक स्वरूप देऊन मागासवर्गीय समुदायावरती कुलगुरू अन्याय करत असल्याचे चित्र तयार करत आहेत. सदर अधिकाऱ्याचे हे कार्य निश्चितच विद्यापीठाच्या नावलौकिकाला बाधा पोहोचवणारे आहे. डॉ. अहिरे विद्यापीठाच्या हिताच्या विरुद्ध काम करत असल्यामुळे त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनाला उत्तर देताना कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील म्हणाले, विद्यापीठ एक कुटुंब असून या कुटुंबात कोणताही जातीभेद केला जात नाही. मी येण्यापूर्वीच प्राध्यापक डॉ. डी. के. कांबळे यांच्यावर चौकशी समिती बसलेली होती. परंतू त्यांची चौकशीची फाईल बघता त्यांचा कोणताही दोष नसल्यामुळे त्यांना या चौकशीतून निर्दोष सोडण्यात आलेले आहे. विद्यापीठातील कोणत्याच प्राध्यापकाचा अर्ज हा कृषी परिषदेकडे तांत्रिक अडचणीमुळे पाठविलेला नाही. परंतु, त्यांची तशीच मागणी असेल तर हे अर्ज या आठवड्यात कृषी परिषदेकडे पाठवण्यात येतील. डॉ. मिलिंद अहिरे हे समाज माध्यमांमध्ये चुकीची माहिती देऊन विद्यापीठाची बदनामी करत आहेत. यावेळी संचालक संशोधन डॉ. विठ्ठल शिर्के व मागासवर्गीय संघटनेचे अध्यक्ष डॉ. विजू अमोलिक यांनी मनोगत व्यक्त करून निषेध व्यक्त केला.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे, मिलिंद ढोके, डॉ.आनंद सोळंके, डॉ.अण्णासाहेब नवले, डॉ. मुकुंद शिंदे, डॉ. बी.टी. पाटील, डॉ. सचिन नांदगुडे, डॉ. सचिन नलावडे, डॉ. विलास वाणी, डॉ. विक्रम कड, डॉ. संजय कोळसे, डॉ. उत्तम कदम आदींनी उपोषणाचा निषेध करून सर्व कर्मचारी हे प्रशासनासोबत असल्याची ग्वाही कुलगुरू यांना दिली. या मूकमोर्चामध्ये विद्यापीठातील संचालकांपासून, अधिकारी, महिला कर्मचारी ते शिपाई व मजूर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# दूधहंडी आंदोलनाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## कोतूळ बंद ठेवून पंचक्रोशीतील शेतकरी आंदोलनात सामील



**अकोले (प्रतिनिधी) -** दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनाचा भाग म्हणून कोतूळ येथे शेतकरी गेली दहा दिवस धरणे आंदोलन करत आहेत. आंदोलनाच्या दहाव्या दिवशी सोमवारी (दि. १५ जुलै) येथील बाजारपेठ बंद ठेवून शेतकरी व ग्रामस्थांनी दूध उत्पादकांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधले. कोतूळ येथील खटपट नाका चौकामध्ये शेकडोच्या संख्येने शेतकरी यावेळी एकत्र आले होते. आंदोलनाच्या मंडपासमोर दूधहंडी फोडण्याचे आंदोलन यावेळी करण्यात आले. वारकरी संप्रदायाने यावेळी आंदोलनाला पाठिंबा दिला. अभंग व भजनाच्या निनादामध्ये मध्यवर्ती चौकात बांधण्यात आलेली हंडी शेतकरी कार्यकर्त्यांनी फोडली व सरकारच्या निषेधार्थ प्रचंड घोषणा दिल्या.

दुधाला प्रतिलिटर ४० रुपये भाव मिळाला पाहिजे, दूध क्षेत्रातील अस्थिरता संपवण्यासाठी दुधाला एफ. आर. पी. व रेव्हेन्यू शेअरिंगचे धोरण लागू केले पाहिजे, पशुखाद्याचे दर कमी केले पाहिजे या प्रमुख मागण्यांसाठी संघर्ष समितीचे आंदोलन सुरू आहे. दूधहंडी फोडण्याच्या अभिनव आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी मोठा प्रतिसाद देत या आंदोलनात भागीदारी केली.

दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने १५ जुलै ते २१ जुलै राज्यभर संघर्ष सप्ताह आयोजित करण्यात आलेला आहे. सोमवारी पहिल्याच दिवशी दूध हंडी फोडून या आंदोलनाची सुरुवात झाली असून महाराष्ट्रभर विविध पद्धतीने हे आंदोलन पुढे जाणार आहे. या आंदोलनात डॉ. अजित नवले, सदाशिव साबळे, विनोद देशमुख,अभिजीत सुरेश देशमुख, नामदेव साबळे, बी.जे. देशमुख, सीताराम देशमुख, राजू देशमुख, बाळासाहेब गिते, विजय वाकचौरे, राजेंद्र गवांदे, गौतम रोकडे, नीलेश तळेकर, नामदेव भांगरे, राजाराम गंभीरे, प्रकाश देशमुख, भाऊसाहेब देशमुख, अभिजीत भाऊसाहेब देशमुख, गणेश जाधव यांनी सहभाग घेतला.

# कार्यकारी अधिकारी निवासस्थान परिसरातील चंदनाच्या झाडांची चोरी

## २४ तास सुरक्षारक्षक तरी चोरी; साईसंस्थान सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



**शिर्डी (प्रतिनिधी)-** साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निवासस्थानाच्या मागील बाजूस बगीचामधील चंदनाची झाडे रविवारी रात्री चोरट्यांनी कापून नेली. २४ तास या परिसरात सुरक्षा रक्षक तैनात असताना झाडांची चोरी झाल्याने संस्थान अधिकाऱ्यांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची निवासस्थाने ५०० रूम भक्त निवास परिसरातील बगीचा विभागाच्या जवळ असून निवासस्थान परिसर सुंदर वनराईने नटला आहे. विविध झाडे याठिकाणी असून बऱ्याच वर्षांपासून चंदनाची झाडे देखील आहेत. हा परिसर अत्यंत सुरक्षित असून या परिसरात साईबाबा संस्थान कर्मचारी वगळता शक्यतो बाहेरील व्यक्तींना याठिकाणी परवानगीशिवाय प्रवेश दिला जात नाही. निवासस्थानाच्या सुरक्षेसाठी दोन सुरक्षारक्षक २४ तास तैनात असतात. रविवारी रात्री अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाच्या पाठीमागील बाजूस बगीचामधील चंदनाची झाडे चोरट्यांनी कापून नेली. निवासस्थानाजवळ जाण्यासाठी एकच मार्ग असून तेथे नेहमी सुरक्षा रक्षक तैनात असतात. निवासस्थानाच्या मागील बाजूस चार चंदनाची मोठी झाडे असून त्या झाडांवर तस्करांची वक्रदृष्टी पडली व चोरट्यांनी गनिमी कावा करत पाठीमागील बाजूस असलेले तार कंपाऊंडच्या तारा दोन ठिकाणी कापून चोरवाट तयार करत बगीचा परिसरात प्रवेश केला.रविवारी रात्री २ चंदनाची झाडे कापून झाल्यानंतर तिसरे झाड कापताना कोणाची तरी चाहूल लागल्याने चोरटे पसार झाले. थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या घराजवळ चोरी करण्याचे धाडस करणारे चोरटे कोण याबाबत सोमवारी संस्थान कर्मचाऱ्यांमध्ये चर्चा सुरू होती. मागील बाजूस चंदनाची झाडे आहेत हे फक्त अधिकाऱ्यांना, बगीचा विभागाला आणि संस्थान कर्मचाऱ्यांनाच माहिती असावे मग या परिस्थितीत चंदनतस्करांना याची माहिती मिळाली कशी? चंदन चोरटे मागील बाजूने तारा कापत असताना त्यांना कोणी पाहिले नाही का? याबाबत नागरिकांमध्ये चर्चा आहे.

# गोवंश जनावरांची संगमनेर पोलिसांकडून सुटका

**संगमनेर (प्रतिनिधी)-** पोलिसांनी वारंवार कारवाया करुनही अवैध कत्तलखाने सुरूच असल्याचे अधोरेखीत होत आहे. रविवारी (दि. १४ जुलै) रात्री संगमनेर शहर पोलिसांच्या पथकाने मदिनानगरमध्ये कत्तलीच्या उद्देशाने दोन वाहनांमध्ये गोवंश जनावरांना घेऊन जाताना पकडले. या कारवाईत पोलिसांनी ४७ हजार रुपयांची जनावरे आणि ७ लाख रुपयांची वाहने, असा एकूण साडेसात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत शहर पोलिसांकडून समजलेली अधिक माहिती अशी, की शहराचे पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांना वाहनांमधून कत्तलीसाठी गोवंश जनावरे घेऊन जात असल्याची गोपनीय खबर मिळाली होती. त्यावरून त्यांनी गस्ती पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या. पथकाने मदिनानगर येथील गल्ली क्रमांक तीनमध्ये सुरुवातीला साडेनऊ वाजता वाहन (क्र. एमएच.१७, बीडी.६३३०) पकडले असता त्यात कत्तलीच्या उद्देशाने वासरे निर्दयतेने नेताना आढळून आले. पोलिसांनी जनावरे आणि वाहन असा एकूण २ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोकॉ. हरिश्चंद्र बांडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राझिक मुन्नीर शहा (वय २६, रा. अपनानगर, संगमनेर) याच्यावर गुन्हा दाखल केला. तर दुसरी कारवाई याच गल्लीत रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास केली. पिकअपमध्ये (क्र. एमएच.१४, डीएम.३००६) कत्तलीच्या उद्देशाने दोन गाई व एक वासरू घेऊन जाताना मिळून आले. पोलिसांनी अंदाजे ४५ हजार रुपयांची तीन गोवंश जनावरे आणि ५ लाख रुपयांची पिकअप असा एकूण ५ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोकॉ. आत्माराम पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सलमान फारुख मणियार (वय ३४, रा. मोमीनपुरा, संगमनेर) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पहिल्या कारवाईचा पुढील तपास पोहेकॉ. डुंबरे करत आहेत. तर दुसऱ्या कारवाईचा तपास पो.ना. महाले करत आहेत.

# कापड दुकान मालकाच्या मुलासह कुटुंबातील पाच जणांवर ॲट्रोसिटी दाखल

**राहाता (वार्ताहर)-** तू माझी बदनामी का करते, मला सर्व माहीत आहे, माझी जर आता बदनामी केली तर तुझा मर्डर करेल आणि जे शरीरसुख मला तिच्याकडून भेटले नाही ते तुझ्याकडून करून घेईल, असे धमकावून कापड दुकानात कामास असलेल्या महिलेला जातीवाचक शिवीगाळ केल्याची फिर्याद पीडित महिलेने दाखल केली आहे. यावरून कापड व्यावसायिकाच्या मुलासह कुटुंबातील पाच जणांवर अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधात्मक कायद्यासह इतर कलमान्वये राहाता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

राहाता शहरातील लोकरुचीनगर येथे महामार्गालगत असणाऱ्या जितेंद्र एन एक्स कापड दुकानात कामाला असणाऱ्या महिलेला आठ दिवसांअगोदर दुकान मालकाचा मुलगा सार्थक चोरडिया याने फोनवरून म्हणाला, तू माझी बदनामी का करते. मला सर्व माहीत आहे. आता बदनामी केली तर तुझा मर्डर करेल. जे शरीरसुख तिच्याकडून मला भेटले नाही ते तुझ्याकडून करून घेईल असं बोलून महिलेला शिवीगाळ केली. तदनंतर दि.१४ जुलै रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास संबंधित महिला विहिरीवर आत्महत्या करण्याच्या इराद्याने गेली होती. तेव्हा तिच्या नातेवाईकांनी विहिरीवरून पकडून तिला घरी आणले होते. यावेळी तिने दुकान मालकाचा मुलगा सार्थक चोरडिया याने माझ्यासोबत फोनवर जे बोलला ते मी माझ्या भावांना सांगितले त्यानंतर माझे भाऊ व मी स्वतः असे आम्ही जितेंद्र एन एक्स कापड दुकानात सार्थकला जाब विचारण्यासाठी गेलो. तेथे आम्ही बोलत असताना अचानक सार्थकने आम्हाला मारहाण व शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर तेथे लाबेश चोरडिया, दिनेश चोरडिया, कमलेश चोरडिया, निलेश चोरडिया आले व त्यांनी आम्हाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ केली. दरम्यान आम्हाला जातीवाचक शिवीगाळ केली. यावेळी झालेल्या मारहाणीत माझा भावाच्या उजव्या हाताला दुखापत झाली.दुसऱ्याच्या पायाला व बरगडीत मार तर तिसऱ्यालाही बरगडीत आणि पाठीला मार लागला. त्यानंतर आम्ही भावांना उपचारासाठी शिर्डी येथील साईसुपर हॉस्पिटल येथे दाखल केले. महिलेच्या फिर्यादीवरून राहाता पोलिसांनी सार्थक चोरडिया, लाभेश चोरडिया, दिनेश चोरडिया, कमलेश चोरडिया, निलेश चोरडिया या पाच जणांविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधात्मक कायद्यासह भारतीय न्याय संहिता १८९ (२), १९१(२), १९०, ११५ (२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने करीत आहेत.

- या घटनेबाबत राहाता पोलिसांत गुन्हा दाखल झाल्यानंतर घटनेची माहिती पत्रकारांना देण्यास पोलीस अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केली. अशा प्रकारच्या घटना सतत घडत असतात यात छापण्यासारखे काही नाही असे पोलीस अधिकाऱ्याचे म्हणणे होते. या मागचे कारण काय? याबाबत उलट-सुलट चर्चा सुरू होती.

- दिनेश निलेश चोरडिया याने सचिन बोरगे यांच्यासह सहा साथीदारांविरोधात लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची फिर्याद पोलिसांत दिली. या फिर्यादीवरून सचिन बोरगेसह सहा आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता १७९ (२),१९१(२) १९० , ११५ (२) ३५२ याप्रमाणे गुन्हा दाखल केला असून या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक अरविंद जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल अभंग करीत आहेत. या घटनेप्रकरणी रात्री उशिरापर्यंत कोणालाही अटक करण्यात आली नव्हती.

नवी आशा नवी दिशा सार्वमत

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करून प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक- ✻ अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)